राज्यातील अनुसूचित जातीच्या १०० विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षि शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना सन २०१६-२०१७

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक : इबीसी-२०१६/प्र.क्र.६७७/शिक्षण-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०७ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा</u>:- १) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : इबीसी २०१३/ प्र.क्र.३८/मावक-२, दिनांक २९ जुन, २०१३
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समक्रमांक, दिनांक १७.१२.२०१६
३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समक्रमांक, दिनांक २१.४.२०१७

शासन निर्णय :-

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षि शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये निकषांत बसणाऱ्या ६७ विद्यार्थ्यांची आणि अटी शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून १८ विद्यार्थ्यांची अशा एकूण ८५ विद्यार्थ्यांची निवड केली होती. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०१६ अन्वये ६७ विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. तसेच अटी शर्तीच्या अधीन राहून निवड केलेल्या १८ विद्यार्थ्यांपैकी अटी शर्तीची पूर्तता करणाऱ्या १३ विद्यार्थ्यांची शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल, २०१७ अन्वये निवड करुन त्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. आता, १८ विद्यार्थ्यांपैकी उर्वरित ५ विद्यार्थ्यांमधून खालील २ विद्यार्थ्यांनी अटीं शर्तीची पूर्तता केलेली असल्याने त्यांना सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येत आहे. त्याबाबतचे विवरणपत्र पुढीलप्रमाणे आहे :-

अ क्र	विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव,	प्रवेश घेतलेल्या संस्थेचे नाव व पत्ता	अभ्यासक्रम	अभ्यासक्रम कालावधी	गुणांची टक्केवारी
१	शिवम संजय कोठेकर	कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे	पदवी, **बी टेक**	४ वर्षे	९२.६९
२	प्रेमकुमार पंढरीनाथ धाडवे	व्ही.जे.टी.आय. माटुंगा, मुंबई	पदवी, **बी टेक**	४ वर्षे	९३.४०

२. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या वरील विद्यार्थ्यांना त्या-त्या शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेले पुर्ण शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांच्यामार्फत संबंधित शैक्षणिक संस्थेला देण्यात येईल. वसतीगृह व भोजन शुल्काचा शैक्षणिक संस्थेने आकारणी केलेला पुर्ण खर्च विद्यार्थ्यांना देण्यात येईल. सदर खर्चाची रक्कम वर्षभरात एकदाच देण्यात येईल. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी लागणारी पुस्तके, शैक्षणिक साहित्य त्याचप्रमाणे इतर शैक्षणिक खर्च

यासाठी एकुण रुपये १०,०००/- प्रत्येक वर्षी देण्यात येतील. त्यांच्या अभ्यासक्रमाच्या खर्चासाठी सन २०१६-२०१७ या वर्षाच्या शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व वसतीगृह भाडे, निर्वाह भत्ता व इतर अनुज्ञेय खर्च याबाबतची माहिती संबधित विद्यापीठाकडून/संस्थेकडून माहिती मागवून आणि विद्यार्थ्याच्या प्रगती व उपस्थितीबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन संबधित महाविद्यालय/संस्थेस अदा करण्याची कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी करावी.

३. ज्या विद्यार्थ्याना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती मंजुर करण्यात आली आहे, त्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर परिक्षोत्तर शिष्यवृत्ती मिळाली असेल ती रक्कम वजा करुन उरलेली अनुज्ञेय रक्कम विद्यार्थ्यांस अदा करण्यात यावी.

४. या योजनेअंतर्गत निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. याबाबत होणारा खर्च हा "मागणी क्रमांक एन-३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१ - अनुसूचित जातीचे कल्याण, २७७ - शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना विघयो **(४) (२२) देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षि शाहू महाराज शिष्यवृत्ती (२२२५ ३८२ ३)** या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून त्याखाली केलेल्या चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. त्याकरीता आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०६१३०११५०७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2018.02.07 16:16:18 +05'30'

(दि. रा. डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
२. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मुंबई
३. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८. संचालक, माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परीक्षा)/(लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१२. अवर सचिव (अर्थसंकल्प) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई
१३. कक्ष अधिकारी (विघयो-१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ,मंत्रालय,मुंबई
१४. निवड नस्ती, शिक्षण १